पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.

क प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्रमांक- ७

स भा वृ तां त

दिनांक ६/२/२०१८ वेळ-दुपारी १२.०० वाजता

---------------------- ------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. “क” प्रभाग समिती मासिक सभा मंगळवार दि.६/२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.अश्विनी संतोष जाधव सभापती

२) मा.सारीका शिवाजी सस्ते

३) मा.राहूल गुलाब जाधव

४) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

५) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

६) मा.लोंढे नम्रता योगेश

७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.नितीन देशमुख- प्र.कार्यकारी अभियंता विदयुत,मा.विशाल कांबळे-कार्यकारी अभियंता जलनिस्सारण, मा.प्रदीप मुथा- प्रशासन अधिकारी, मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा.माने- उपअभियंता स्था, वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.बरीदे- उपअभियंता स्थापत्य,मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.वसंत उगले- लेखाधिकारी, मा.शेख-कनिष्ठ अभियंता विदयुत,श्रीमती दमयंती पवार,श्री.केदार- कनिष्ठ अभियंता विदयुत हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

----

उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या, अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) ९ मी.रोडचा प्रस्ताव करणेबाबत- मा.राहुल जाधव,मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- २) प्रभाग क्र.८ मध्ये नामकरण दुरुस्त करण्यास मान्यता देणेबाबत ( मा.क प्रभाग समिती ठराव क्र. १५ दि.७/११/२०१७ ) –मा.विलास मडिगेरी,मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) प्रभाग क्र.८ मध्ये कराड बँके समोरील फुटपाथ काढून रोडमध्ये वाढ करण्यास मान्यता देणेबाबत- मा.विलास मडिगेरी,मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

----

अ) दिनांक ५/१२/२०१७ व दिनांक २/१/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २/१/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक- १

दिनांक-६/२/२०१८

सुचक-मा.राहुल जाधव अनुमोदक-मा.विलास मडिगेरी

संदर्भ-मा.राहुल जाधव,मा.विलास मडिगेरी यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र. २ मधील गट नं.६१७ ते गट नं.६८० पर्यंत ग्रामपंचायतचा रोड असुन वाढत्या लोकसंख्येचा विचार करता नऊ मीटरचा रोड करणेस तसेच गट नं.६०६ ते गट नं.६६०,६६१,६६२ पर्यंत नऊ मीटर रोडच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक- २

दिनांक-६/२/२०१८

सुचक-मा.विलास मडिगेरी अनुमोदक-मा.नम्रता लोंढे

संदर्भ-मा.विलास मडिगेरी, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

मा.क प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक १५ दिनांक ०७/११/२०१७ मध्ये “२) सेक्टर क्रमांक २ मधील तिरुपती बालाजी चौक पासून ते यशवंतराव चव्हाण चौकास **“मोरया चौक”** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. **याऐवजी** “सेक्टर क्रमांक २ मधील साई रेसीडेन्सी कडून प्रियदर्शनी शाळेकडे वळणा-या चौकास **“मोरया चौक”** असे नामकरणास मान्यता देणेत येत आहे. हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक- ३

दिनांक-६/२/२०१८

सुचक-मा.विलास मडिगेरी अनुमोदक-मा.नम्रता लोंढे

संदर्भ-मा.विलास मडिगेरी, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

सेक्टर क्रमांक २ येथील कराड बँके समोरील कार्नर पासून रामकृष्ण मोरे कमानपर्यंत फुटपाथ काढुन रोडमध्ये वाढ करण्यास मान्यता देणेत येत आहे. (कारण रस्ता खुप छोटा असल्याने वाहनांची प्रचंड ट्रॅफिक होत असल्याने ये-जा करणा-या लोकांना खुप वेळ लागतो व खूप त्रास सहन करावा लागतो.)

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

-------

यानंतर सर्वांचे आभार मानून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

(**अश्विनी संतोष जाधव** )

सभापती

क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – २६.

क्र-कक्षेका/कावि/०९ /२०१८.

दिनांक- १२/२/२०१८.

सही/-

प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग

-------------------